भारती विद्यापीठाचे

# मातोश्री बयाबाई श्रीपतराव कदम कन्या महाविद्यालय कडेगाव

## Department of Marathi

## Outreach Activity

**Name of Faculty: Dr. Savita Ashok Mali**

**Place: - Art's & Commerce College Kadepur, Tal. Kadegaon Dist. Sangli.**

**Topic: Marathi Bhasaha Sanvardhan Pandharvada – Opener and Guest Lecturer**

**Date: 19 January 2023**



Estd. June 1984

ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यासाठी शिक्षणप्रसार'' – शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे

Shri Swami Vivekanand Shikshan Sanstha, Kolhapur's

आर्टस् अॅण्ड कॉमर्स कॉलेज, कडेपूर

# ARTS AND COMMERCE COLLEGE, KADEPUR

Tal. Kadegaon, Dist. Sangli 415 305
Ph. (Office) 02347 - 241327 / 344
• Email : acc.kadepur@gmail.com • Website : www.acckadepur.org •
Affiliated to Shivaji University, Kolhapur •



| FOUNDER | PRESIDENT | EXECUTIVE PRESIDENT | SECRETARY | I/C PRINCIPAL |
|---|---|---|---|---|
| Shikshanmaharshi Dr. Bapuji Salunkhe<br>Dalitmitra, D.Litt. | Hon. Chandrakant (Dada) Patil<br>Minister of Higher & Tech. Education<br>Govt. of Maharashtra | Prin. Abhaykumar Salunkhe<br>M.A. | Prin. Mrs. Shubhangi Gawade<br>M.Sc., B.Ed. | Mr. Bapurao B. Pawar<br>M.A., B.Ed., SET |

Ref.No.

Date : १७/०१/202२

## निमंत्रण पत्र

प्रति,
डॉ.सविता माळी,
मातोश्री बयाबाई श्रीपतराव कदम कन्या महाविद्यालय,
कडेगाव,जि-सांगली.

महोदया,

आमच्या महाविद्यालयात मराठी विभागाच्या वतीने दिनांक १९/०१/२०२२ रोजी 'मराठी भाषा संवर्धन पंधरवडा' या कार्यक्रमासाठी आपण उद्घाटक व मार्गदर्शक म्हणून उपस्थित राहावे ही नम्र विनंती.

प्राचार्य
PRINCIPAL
Arts & Commerce College,
Kadepur, Tal. Kadegaon, Dist. Sangli

Arts and Commerce College, Kadepur
*Dist. Sangli*

दै.प्रगल्भनायक दि. २० जानेवारी, २०२३

# मराठी भाषेतील साहित्य म्हणजे वैभवाची खाण:प्रा.डॉ. सविता माळी

**प्रगल्भनायक न्यूज नेटवर्क**
**कडेगांव**

महानुभावी साहित्यापासून ते संत साहित्य, पंत साहित्य, तंत साहित्य, पंडिती काव्य आणि आधुनिक मराठी साहित्य म्हणजे वैभवाची खाण असून हे वैभव आपण विसरत चाललो आहोत हे आपले दुर्दैव्य आहे असे प्रतिपादन कन्या महाविद्यालयाच्या मराठी विभाग प्रमुख प्रा.डॉ. सविता माळी यांनी केले.

ते आर्टस् अॅन्ड कॉमर्स कॉलेज, कडेपूर येथे 'मराठी भाषा संवर्धन पंधरवडा' उद्घाटन प्रसंगी बोलत होत्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.बापूराव पवार होते. संपूर्ण महाराष्ट्रामध्ये १४ जानेवारी ते २८ जानेवारी या कालावधीत 'मराठी भाषा संवर्धन पंधरवडा साजरा केला जातो. त्याचे उद्घाटन प्रा. डॉ. सविता माळी यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी प्रा. कुमार इंगळे,





सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा. शीला इंगवले, प्रा. शिवराज उथळे उपस्थित होते. प्रारंभी प्रा.डॉ.नामदेव पाटील यांनी आपल्या प्रास्ताविकात मराठी भाषा संवर्धन पंधरवडा साजरा करण्यामागील उद्देश सांगितला.

ज्ञानेश्वरांची ओवी, तुकारामांचे अभंग, एकनाथांनी भारुडे याबरोबरच संत, पंथ - तंत व पंडिती काव्य हे मराठी भाषेचे वैभव आहे हे वैभव आपण विसरत चाललो आहोत, हे आपले दुर्दैव्य आहे असे सांगून त्या पुढे म्हणाले की, मराठी भाषेचे सामर्थ्य वाढविण्यासाठी आपण सर्वांनी प्रयत्न केले पाहिजे. वाचन करून विदयार्थ्यांनी शब्दाच्या माध्यमातून अनुभव व्यक्त केले पाहिजेत असेही त्या शेवटी म्हणाल्या.

यावेळी अध्यक्षपदावरून बोलताना प्राचार्य डॉ.बापूराव पवार म्हणाले की, आज संपूर्ण मानवी जीवन प्रसारमाध्यमांनी व्यापले आहे. मराठी भाषेचे संवर्धन, प्रसार आणि प्रचार करण्यासाठी प्रसारमाध्यमांमध्ये जास्तीत- जास्त मराठीचा वापर केला पाहिजे, असे सांगून ते पुढे म्हणाले की, इतर भाषेचा आदर करून त्या-त्या भाषेतील शब्दांचा स्विकार करुन मराठी भाषेतील शब्द वैभव वाढविले पाहिजे. मराठीचे साहित्य वैभव इंग्रजीच्या मदतीने जागतिक स्तरावर पोहोचविले पाहिजे असेही ते शेवटी म्हणाले. प्रारंभी शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांच्या पुतळ्याचे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. महाविद्यालयामध्ये मराठी भाषा संवर्धन पंधरवडाच्या निमित्ताने विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले असून जास्तीत-जास्त विद्यार्थ्यांनी सहभागी व्हावे असे आवाहन मराठी विभागाच्या वतीने करण्यात आले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्रा. कुमार इंगळे तर आभार प्रदर्शन प्रा.डॉ. नामदेव पाटील यांनी केले. कार्यक्रमास प्राध्यापक वृंद, विद्यार्थी-विद्यार्थिनी व सेवक वर्ग उपस्थित होते.

Dr. Savita Ashok Mali, Assistant Professor, Department of Marathi, BV's MBSK Kanya Mahavidyalaya, Kadegaon Engaged as Opener & Guest Lecturer at **Art's & Commerce College Kadepur, Tal. Kadegaon Dist. Sangli** held on 19 January 2023. He gave guidance about the Marathi Bhasha sanvardhan and use. He has motivated the students to start preparation of Marathi Bhasha as it is a must for their career in the future. The guest lecture was conducted for Senior college students. Around 100 students were attended the lecture.




Principal

भारती विद्यापीठाचे

# मातोश्री बयाबाई श्रीपतराव कदम कन्या महाविद्यालय कडेगाव

Department of Marathi

**Outreach Activity**

Name of the Faculty: Dr. Savita Mali
Place: Z.P. School Kadegaon
Date: 18/01/2023

## Book Donation

मातोश्री बयाबाई श्रीपतराव कदम कन्या महाविद्यालयाच्या मराठी विभागाच्या वतीने ‘मराठी भाषा संवर्धन पंधरवडा’ व ‘सामाजिक उपक्रमांतर्गत’ बुधवार दिनांक १८ जानेवारी २०२३ रोजी कडेगाव शहरातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेमध्ये विद्यार्थ्यांना पुस्तके वाटप करण्यात आली. विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची गोडी निर्माण व्हावी आणि त्यांचा प्रसारमाध्यमांकडे (मोबाईल व टीव्ही) असलेला ओढा आणि आकर्षण कमी व्हावे, त्यांच्यामध्ये वाचन संस्कृती रुजावी व ती प्रबुद्ध व्हावीत या उद्देशाने इयत्ता पहिली ते सातवी या वयोगटातील विद्यार्थ्यांना उपयोगी ठरतील अशा आदर्श व्यक्तिमत्त्वांची चरित्रे, विज्ञान, साहित्य, कला, संस्कृती विषयक ८० पुस्तकांचे वाटप महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. डॉ. व्ही. वाय. कदम सर, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष श्री. हणमंत रास्कर व जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कडेगावचे मुख्याध्यापक श्री. राजाराम जगदाळे यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमास जिल्हा परिषद प्राथमिक शाळेमधील सर्व शिक्षक व शिक्षिकांनी मनःपूर्वक सहकार्य केले. विद्यार्थ्यांनी दिलेल्या उत्स्फूर्त प्रतिसादाने आमचा आनंद द्विगुणीत झाला. या कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक मराठी विभाग प्रमुख प्रा. सौ. उज्ज्वला देसाई यांनी केले व मराठी विभागाच्या डॉ. सविता माळी यांनी आभार प्रदर्शन केले. यावेळी योगिता यादव हिने ‘ग्रंथ माझे गुरु’ ही कविता सादर केली. या कार्यक्रमास महाविद्यालयातील मराठी विभागाच्या दिव्या यादव, योगिता यादव, प्रियांका यादव, मनीषा कदम व कोमल आंबवडे या विद्यार्थिनीही उपस्थित होत्या.













# भारती विद्यापीठाचे

# मातोश्री बयाबाई श्रीपतराव कदम कन्या महाविद्यालय कडेगाव

Department of Marathi

**Outreach Activity**

Name of the Faculty: Dr. Savita Mali

College Students: 34 Students of B. A. II &III, M. A. I & II


Place: Mahanubhav Pant Mahila Ashram

Date: 19/01/2023

भारती विद्यापीठाचे मातोश्री बयाबाई श्रीपतराव कदम कन्या महाविद्यालयाच्या मराठी विभागाच्या वतीने बी. ए. भाग २ व ३ आणि एम. ए. भाग १ व २ या वर्गातील विद्यार्थिनीं बुधवार दिनांक १६/०१/२०२३ रोजी महानुभाव पंथ महिला आश्रम सदाशिवगड भेट दिली. या भेटीमध्ये एकूण ३४ विद्यार्थिनी सहभागी झालेल्या होत्या.

महानुभाव पंथ महिला आश्रम सदाशिवगड









# भारती विद्यापीठाचे

# मातोश्री बयाबाई श्रीपतराव कदम कन्या महाविद्यालय कडेगाव

Department of Marathi

## Outreach Activity

Name of the Faculty: Dr. Savita Mali

College Students: 34 Students of B. A. II &III, M. A. I & II

Place:  S. G. M. College Karad

Date: 19/01/2023

सदगुरु गाडगे महाराज महाविद्यालय कराड येथील ग्रंथालयास भेट देण्यात आली.

सदगुरु गाडगे महाराज महाविद्यालय कराड

